नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd
अंक - १५१ | Issue - 151
वार गुरुवार दि. १७ ऑक्टोबर २०२४ | Blow- Thursday Date 17 October 2024
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## न्यायदेवतेच्या डोळ्यावरील काळीपट्टी हटवली, हातात तलवार नव्हे तर संविधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारतातील कोणत्याही न्यायालयात न्यायदेवतेची मूर्ती दिसते. न्यायदेवतेच्या हातात तराजू, तलवार असते आणि त्याच बरोबर तिच्या डोळ्यांवरपट्टी दिसते. अनेकदा हिंदी चित्रपटांमध्ये यावरून तुम्ही संवाद देखील ऐकला असेल. भारतीय न्यायालयाने आता ब्रिटिश काळातील परंपरा मागे टाकून नवी पद्धत स्विकारण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसांपूर्वी ब्रिटिश कायद्यांमध्ये बदल करण्यात आले होते. आता भारतातील न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टी हटवण्यात आली आहे .

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी यासंदर्भातील बदलांसाठी पुढाकार घेतला होता. आता त्यांच्या आदेशानुसार न्यायदेवतेच्या मूर्तीत बदल करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या ग्रंथालयासमोर न्यायदेवतेची नवी मूर्ती लावण्यात आली आहे. आधीच्या मूर्तीवर डोळ्यांवर पट्टी लावलेली असायची आणि एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात शिक्षा देण्यासाठी तलवार असायची.आता नव्या मूर्तीच्या डोळ्यावरील पट्टी हटवली गेली आहे. तसेच हातात तलवारच्या ऐवजी संविधानाची प्रत दिसते.

सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यामते आता आपल्याला ब्रिटिशांच्या परंपरा आणि वारशाच्या पुढे गेले पाहिजे. कायदा कधीच अंध असू शकत नाही. तो सर्वांना समान पद्धतीने पाहतो. यामुळेच सरन्यायाधीश न्यायदेवतेच्या मूर्तीत बदल केला जाण्याची गरज असल्याचे म्हटले होते. त्याच बरोबर देवीच्या एका हातात तलवारच्या जागी संविधान पाहिजे. ज्यामुळे समाजात संदेश जाईल की देवी संविधानानुसार न्याय करते.

### सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांचा मोठा निर्णय

सरन्यायाधीशांच्या मते तलवार हिंसेचे प्रतीक आहे. न्यायालयात हिंसा नाही तर संविधानाच्या कायद्यानुसार न्याय होतो. दुसऱ्या हातात असलेला तराजू योग्य आहे जो सर्वांना समान पद्धतीने न्याय देते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी दिलेल्या आदेशानंतर न्यायदेवतेची नवी मूर्ती तयार करण्यात आली. अशी पहिली मूर्ती न्यायधीशांच्या ग्रंथालयाबाहेर लावण्यात आली. ज्या मूर्तीच्या डोळ्यावर पट्टी नाही आणि हातात तलवार ऐवजी संविधान आहे.

न्यायदेवतेची मूळ मूर्ती यूनानमधील प्राचीन देवी असल्याचे सांगितले जाते. तिला न्यायाचे प्रतीक म्हटले जाते. या देवीचे नाव जस्टिया असून त्यातूनच जस्टिस हा शब्द तयार झाला. या देवीच्या डोळ्यावर कायम पट्टी असायची, याचा अर्थ न्यायदेवी नेहमी निष्पक्ष राहून न्याय करेल. कोणाला पाहून न्याय करताना निर्णय एकाच्या बाजूने दिला जाऊ शकतो यासाठी ही पट्टी बांधण्यात आली होती.

## थोडक्यात

### पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल यांची ८५ कोटींची मालमत्ता जप्त

पुणे : पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल यांची ८५ कोटी रुपयांची मालमत्ता सक्त वसुली संचालनालयाने (ईडी) जप्त केली. बांदल यांची पुणे, सोलापूर, अहमदनगर जिल्ह्यात असलेल्या मालमत्ता ईडीकडून जप्त करण्यात आली. बेकायदा आर्थिक व्यवहार (मनी लॉड्रिंग) प्रकरणी मंगलदास बांदल यांच्या शिक्रापूर आणि महंमदवाडीतील निवासस्थानी ईडीने २१ ऑगस्ट रोजी छापे टाकले होते. ईडीकडून बांदल यांच्या निवासस्थानातून कागदपत्रे जप्त केली. बांदल यांच्या बँक खात्यांची माहिती ईडीच्या अधिकाऱ्यांनी घेतली. त्यानंतर बांदल यांना ईडीकडून अटक करण्यात आली. बांदल यांच्याविरुद्ध पुणे पोलिसांनी एका प्रसिद्ध सराफ व्यावसायिकाला धमकावल्याप्रकरणी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली होती. बांदल यांच्याविरुद्ध शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. बांदल यांनी लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी मिळवली होती. मात्र, बांदल यांची ग्रुहेगारी पार्श्वभूमी विचारात घेऊन त्यांची उमदेवारी रद्द करण्यात आली होती.

## ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्रीपदाची घेतली शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्रीपदाची बुधवारी शपथ घेतली. केंद्रशासित प्रदेशाचे ते पहिले मुख्यमंत्री आहेत. २०१९ मध्ये अनुच्छेद ३७० हटविल्यानंतर ही पहिलीच निवडणूक होती.

नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी ओमर अब्दुल्ला व पाच मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. जम्मूतील सुरिंदर चौधरी हे उपमुख्यमंत्री असतील. ओमर यांच्याकडे दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद आले आहे. यापूर्वी पूर्ण राज्य असताना २००९ ते २०१४ या कालावधीत ते मुख्यमंत्री होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओमर यांचे अभिनंदन केले. जम्मूचे तीन तर काश्मीर खोऱ्यातील दोन मंत्री नेमून संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे. चौधरी यांच्याव्यतिरिक्त साकिना मसूद, जावेद दर, आणि सतीश शर्मा, जावेद राणा, काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची निवडणूकपूर्व युती होती. मात्र काँग्रेसचा मंत्रिमंडळात सामील झाला नाही. राज्याचा दर्जा



नसल्याने आम्ही समाधानी नाही, असा युक्तिवाद काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तारिक हमीद कारा यांनी केला. शपथविधी सोहळ्याला काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, माकपचे प्रकाश करात, द्रमुकच्या कानिमोळी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, पीडीपीच्या सर्वेसर्वा मेहबूबा मुफ्ती यांची उपस्थिती होती. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी एकजूट दाखविण्याचा प्रयत्न केला. ९५ सदस्यीय काश्मीर विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्सचे ४२ आमदार आहेत, तर काँग्रेसला सहा जागा मिळाल्या आहेत. पाच सदस्य हे राज्यपाल नियुक्त आहेत.

## दहावी, बारावी परीक्षा वेळापत्रकाबाबत राज्य मंडळाचे महत्त्वाचे स्पष्टीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी- मार्च २०२५मध्ये होणाऱ्या दहावी- बारावीच्या परीक्षांची अंतिम वेळापत्रके अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे दहावी, बारावीच्या परीक्षांची समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झालेली वेळापत्रके ग्राह्य धरू नयेत, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले. तसेच राज्य मंडळाचे बोधचिन्ह, नावाचा वापर करून परीक्षेबाबत चुकीची माहिती प्रसारित करून पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. दहावी, बारावीच्या परीक्षांच्या संभाव्य तारखांबाबत हरकती, सूचना मागवण्यात आल्या होत्या.

## विधानसभेसाठी मोदींच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत बैठक, महायुतीच्या उमेदवारांची नावे होणार निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचे राज्यातील उमेदवार निश्चित करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बुधवारी संध्याकाळी नवी दिल्लीत बैठक पार पडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा आणि आरोग्य मंत्री आणि पक्षाचे प्रमुख जेपी नड्डा यांच्यासह प्रमुख नेते या बैठकीला उपस्थित होते. महाराष्ट्र विधानसभेसाठी २८८ जागावर येत्या २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात निवडणूक होणार आहे. येत्या २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. तत्पूर्वी, भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने मंगळवारी झारखंड निवडणुकीसंदर्भात बैठक घेतली. झारखंडमध्ये १३ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबरला दोन टप्प्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. तर आज महाराष्ट्राच्या निवडणुकीसाठी बैठक पार पडली आहे. आता महायुतीच्या जागावाटपाबाबत आधीच अमित शाहा यांच्या अध्यक्षतेखाली अनेक बैठका पार पडल्या आहेत. आज होणाऱ्या बैठकीत

महाराष्ट्र निवडणुकीतील प्रमुख प्रतिस्पर्धी सत्ताधाऱ्यांची महाविकास आघाडी आहे. तर महायुतीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचा समावेश आहे. महाविकास आघाडी ज्यामध्ये शिवसेना (णइढ), राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि काँग्रेस यांचा समावेश आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विरोधात असलेल्या महाविकास आघाडीने चांगली कामगिरी करत राज्यातील ४८ पैकी ३१ जागा मिळवल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आता विधानसभेसाठी भाजपच्या



दिल्लीतील नेतृत्वाने चंग बांधला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडून महायुतीची सत्ता जावू नये, यासाठी दिल्लीतून आता विशेष नियोजन करण्यात येत आहे.

निवडणूक आयोगाने मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. याव्यतिरिक्त, १५ राज्यांमधील ४८ विधानसभेच्या जागा आणि लोकसभेच्या दोन जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर केली. याचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. यामध्ये राज्यातील नांदेडच्या एका लोकसभा जागेचा सुद्धा समावेश आहे. महाविकास आघाडीविरुद्ध महायुती असा सामना आगामी एक महिन्यात राज्यात पाहायला मिळेल.

**एकनाथ शिंदेंकडून विरोधकांचा समाचार**

**सत्तेत आल्यास योजना सुरु राहतील**

## महायुतीच्या प्रगतीपुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यास मुख्यमंत्री लाडकी बहीण, शेतकऱ्यांना मोफत वीज यासह अनेक कल्याणकारी व लोकप्रिय योजना बंद होतील, असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केला. महायुती सरकारच्या योजना केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आणलेल्या नसून आम्ही सत्तेवर आल्यावरही त्या कायम सुरू राहतील, अशी ग्वाही शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी दिली.

महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामगिरीचे संक्षिप्त प्रगतीपुस्तक 'रिपोर्ट कार्ड' या नावाने प्रसिद्ध करण्यात आले आहे. यानिमित्त घेतलेल्या पत्रकार परिषदेत शिंदे, फडणवीस व पवार यांनी महाविकास आघाडीवर टीकेची झोड उठविली.

महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यावर आमच्या सरकारच्या निर्णयांना स्थगिती दिली जाईल, असे उद्धव ठाकरे यांनी जाहीर केल्याचा दावा शिंदे यांनी केला. महाविकास आघाडी आपल्या कार्यकाळात अनेक घोषणा आणि आश्वासने दिली. मात्र ती पूर्ण न करता हात वर केले. वचनपूर्तीचा अहवाल सादर करण्यासाठी हिंमत लागते. विकासविरोधी दृष्टिकोन ठेवत आघाडी सरकारने अडीच वर्षे राज्याचे नुकसान केले. मात्र महायुती सरकारने विकास, उद्योगस्नेही धोरणे, कल्याणकारी योजना आखत महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर नेले. पायाभूत क्षेत्रात अभूतपूर्व काम करीत अटल सेतू, सागरी मार्ग, मेट्रो रेल्वे, समृद्धी महामार्ग याद्वारे राज्याच्या विकासाला वेग दिला. आमच्या सरकारकडे देण्याची नियत आहे आणि नीती आहे. त्यामुळे प्रत्येक समाज घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या सरकारच्या कामगिरीमुळे विरोधक बिथरले असून खोटे व असंबद्ध बरळत आहेत, अशी टीका शिंदे यांनी केली.

फडणवीस म्हणाले की, स्थगिती सरकार गेल्यानंतर गेल्या सव्वादोन वर्षांत जनतेने गतिमान आणि प्रगती सरकारचे काम अनुभवले आहे. सरकारकडे पैसे नसल्याने लाडकी बहीण योजना निवडणूक झाल्यावर बंद होणार, अशी अफवा विरोधक पसरवीत आहेत. पण आमच्या सरकारच्या योजना केवळ कागदावर नसून त्यासाठी योग्य आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय जाहीर केला




आणि निवडणूक जिंकल्यावर लगेच मागे घेतला. आम्ही तसे करणार नसून सौरऊर्जा प्रकल्प पुढील दोन वर्षात कार्यान्वित झाल्यावर सरकारला स्वस्त वीज मिळून पैसे वाचतील आणि शेतकऱ्यांना मोफत वीज कायम सुरूच राहील.

महायुती सरकारचे अभूतपूर्व काम पाहून विरोधक गडबडले आहेत. सर्वसामान्यांच्या जीवनात घडलेले बदल विरोधकांच्या पचनी पडत नसल्याने ऊठसूट अपप्रचार करण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. राज्य कर्जबाजारी झाले आहे, असे सांगून लाडकी बहीण योजनेबाबत अपप्रचार होत आहे. मात्र दोन कोटी ३० लाख लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात पाच महिन्यांचे पैसे जमा झाले आहेत. या योजनेसाठी आधी १० हजार कोटी रुपये व नंतर ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ही योजना कायमस्वरूपी सुरू राहील, असे स्पष्ट केले.

## मुंबई गोवा महामार्गाला परतीच्या पावसाचा तडाखा, परशुराम घाटात मातीचा भराव गेला वाहून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिपळूण - गेली कित्येक वर्षे रखडलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने परतीच्या पावसातही दगा दिला. महामार्ग तयार करण्यासाठी पेढे नजीक केलेला मातीचा भराव बुधवारी रात्री झालेल्या परतीच्या पावसात वाहून गेला. त्यामुळे रस्त्यालाही धोका निर्माण झाला आहे. सध्या महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू आहे. वाहन चालक सध्या जीव मुठीत धरून प्रवास करीत आहेत.

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम १८ वर्षांपासून रखडलेले आहे. परशुराम घाट ते कशेडी घाट पायथा या दरम्यानच्या ४४ किलोमीटर रस्त्याचे काम कल्याण टोलवेज इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडे आहे. अन्य तालुक्यांमध्ये काम करणाऱ्या ठेकेदार कंपन्यांच्या तुलनेत या कंपनीने महामार्ग चौपदरीकरणाचे काम जलद गतीने पूर्ण केले असले तरी संपूर्ण ४४ किलोमीटरच्या रस्त्यात अनेक त्रुटी ठेवल्या आहेत. कामाचा दर्जाही निकृष्ट आहे. हे आता हळूहळू जनतेसमोर येऊ लागले आहे. सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याला कुठेही लेवल नाही. त्यामुळे रस्त्यावरून धावणारी वाहने आदळत, आपटत धावत असतात. चौपदरीकरणापेक्षा आधीचा रस्ता चांगला होता असे म्हणायची वेळ वाहन चालकांवर आली आहे. परशुराम घाटात रस्ता बनविण्यासाठी डोंगर कटाई करण्यात आली. तीही चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे आता



त्या तयार रस्त्यावर पावसाळ्यात दरडी कोसळत आहेत. यावर्षी पावसाळ्यात सुरवातीलाच दरडी कोसळल्या. काही ठिकाणी मातीचा भराव टाकून रस्ता बनविण्यात आला आहे. त्याच्या बाजूला संरक्षण भिंती बांधण्यात आल्या आहेत. गुरुवारी पहाटे परतीच्या पावसात मातीचा भराव आणि रस्त्याच्याकडेला बांधलेली संरक्षक भिंत वाहून गेली. रस्त्याच्या खालील मातीचा भरावही वाहून गेला आहे. ज्या ठिकाणी ही घटना घडली तिथपासून काही अंतरावर पेढे गावची लोकवस्ती आहे. सुदैवाने हा भराव लोकवस्तीमध्ये गेला नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. रस्ता सिमेंट काँक्रीटचा असल्यामुळे तो तुटला नाही. पहाटेच्या दरम्यान घडलेली ही घटना वाहन चालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्याठिकाणाहून वाहने नेण्याचे टाळले. सकाळी या घटनेची माहिती राष्ट्रीय महामार्ग विभागाला मिळाल्यानंतर महाड येथील उपअभियंता अमोल माडकर आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले.

## संपादकीय....

# कारभाराचा लेखाजोखा

महायुतीमधील प्रमुख नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारच्या मागील अडीच वर्षांच्या कारभाराचा लेखाजोखा मांडला. महायुतीसमोर सध्या मनोज जरांगे यांचं मोठं आव्हान उभं आहे. आचारसंहिता लागू होईपर्यंत मराठा आरक्षणाचा निकाल लागला नाही तर आम्ही वेगळा निर्णय घेऊ अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली होती. त्यामुळे निवडणुकीत महायुतीला मनोज जरांगे यांच्यामुळे मोठा फटका बसू शकतो का? यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही बोलतो ते करतो. आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार आहोत. ओबीसी समाजाला किंवा इतर कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार. मी भर दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायाची शपथ घेतली, त्यानंतर ताबडतोब विधानसभेचं अधिवेशन बोलावलं आणि मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं. परंतु, ते आरक्षण रद्द करण्यासाठी न्यायालयात कोण गेलं हे सर्वांना माहिती आहे. त्या आरक्षणाविरोधातील याचिकाकर्ते कोण आहेत ते सर्वांना माहिती आहे. तरीदेखील आम्ही ते आरक्षण टिकवलं. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने देखील मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. मात्र, महाविकास आघाडीने ते आरक्षण घालवलं. सर्वोच्च न्यायालयात त्या आरक्षणासाठी भक्कम बाजू मांडायला हवी होती, त्यासाठी पुरावे मांडायला हवे होते. मात्र, ते सरकार अपयशी ठरलं. दरम्यान महायुतीच्या कामाची माहिती देताना उद्धव ठाकरे यांची खिल्ली उडवली. वर्षावर कोणी गेलं की सही करायला उद्धव ठाकरेंकडे पेन नसायचा, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंवर ताशेरे ओढले. दिवसातून हजारो लोक आज आम्हाला भेटतात. पूर्वीची परिस्थिती बघा कोण जात होतं वर्षावर, कोणासाठी वर्षाचे दरवाजे उघडे होते, किती लोकांना भेटत होते? याचा विचार जनता करेल. जनता बोलते हे चालतं बोलतं सरकार आहे. मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये तुम्ही दोन-तीन कोटी दिले, आम्ही साडे तीनशे कोटी दिले. हे कुणाचे पैसे आहेत. हे जनतेचे पैसे आहे. आला कोणी की आम्ही लगेच सही करतो, तुमचा तर पेन पण निघत नव्हता. पेन ठेवतच नव्हते. त्यामुळे हे असं.. असं.. म्हणत मुख्यमंत्र्यांनी एक एक कागद बाजूला ठेवून दाखवला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी लोकांच्या निवेदनांकडे कशाप्रकारे दुर्लक्ष केलं, हे यावेळी शिंदेंनी कृतीतून सांगत त्यांची खिल्ली उडवली. एका रिपोर्ट कार्डमध्ये मावतील इतकी काम महायुती सरकारने केली आहेत. इन्फ्रा प्रकल्पांमुळे राज्याच्या विकासाला गती मिळाली, महायुतीचं अडीच वर्षातील काम वाखाणण्याजोगे आहे. मविआने अडीच वर्षात सर्व प्रकल्प बंद पाडलेले. महायुतीमुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या आणि हाताला काम मिळालं. गडचिरोली जिल्ह्यांपर्यंत उद्योग नेलेत. खोटं बोलायचं पण रेटून बोलायचं ही मविआची निती. प्रकल्प पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. विरोधक गोंधळलेले आणि बिथरलले आहेत. पण, महायुती टीम म्हणून काम करत आहे.

# साधी राहणी, सोज्वळ स्वभाव असा दानवीर : रतन टाटा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रतन टाटा हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. १९९० ते २०१२ या काळात ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते आणि ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष होते, तसेच त्यांच्या चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व करीत होते. ते पद्मविभूषण आणि पद्मभूषण या भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कारांचे प्राप्तकर्ते आहेत. रतन टाटा यांना २००० मध्ये पद्मभूषण आणि २००८ मध्ये पद्मविभूषण, भारत सरकारचा तिसरा आणि दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. टाटा यांना २००६ मध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक प्रशासनातील त्यांच्या कामासाठी 'महाराष्ट्र भूषण' आणि आसाममध्ये कर्करोगाच्या उपचारात योगदान दिल्याबद्दल २०२१ मध्ये 'आसाम वैभव' असे विविध राज्य नागरी सन्मानही मिळाले आहेत.

त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी ब्रिटिश राजवटीत मुंबई येथे झाला होता. 'रतन' हे नवल टाटा यांचे पुत्र आणि टाटा कुटुंबातील वंशज हाते, ज्यांना नंतर टाटा समूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पुत्र रतनजी टाटा यांनी दत्तक घेतले होते. टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या भाची सूनी टाटा या त्यांच्या आई होत. टाटांचे आजोबा होर्मुसजी टाटा हे रक्ताने टाटा कुटुंबाचे सदस्य होते. १९४८ मध्ये टाटा १० वर्षांचे असतांना, त्यांचे आई-वडील विभक्त झाले तेव्हा आणि त्यानंतर त्यांचे संगोपन केले आणि रतनजी टाटा यांच्या आजी आणि विधवा नवजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांना एक धाकटा भाऊ (जिम्मी टाटा) आहे आणि नोएल टाटा हे सावत्र भाऊ आहेत, जे त्यांच्या वडिलांच्या दुसऱ्या पत्नी सिमोन टाटा यांचे पुत्र आहेत. टाटा यांनी कधीही लग्न केले नाही आणि त्यांना मूलबाळ नव्हते. २०११ मध्ये त्यांनी सांगितले की, मी चार वेळा लग्न करण्याच्या जवळ आलो आणि प्रत्येक वेळी मी भीतीने किंवा एका कारणास्तव मागे हटलो.

मुंबईच्या कॅम्पियन स्कूलमध्ये त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, शिमला येथील बिशप कॉटन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. नंतर त्यांनी १९५५ मध्ये न्यूयॉर्क येथील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतल्यानंतर टाटा यांनी कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला, ज्यामधून त्यांनी १९५९ साली वास्तुशास्त्र मध्ये पदवी प्राप्त केली. कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलचे व्यवस्थापन कार्यक्रमाचे ते माजी विद्यार्थी होते. १९७५ मध्ये त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या सात-आठवड्याच्या प्रगत व्यवस्थापन कार्यक्रमात भाग घेतला. कॉर्नेलमध्ये असतांना टाटा अल्फा सिग्मा फी फ्रेटरनिटीचे सदस्य बनले. त्यानंतर ते त्यांच्या कंपनीत रुजू झाले. तेव्हा ते टाटा स्टीलच्या शॉप फ्लोअरवर काम करायचे.

टाटा समूहाचे संस्थापक असलेल्या जमशेदजी टाटांचा नातू अशा पद्धतीने धडपड करतो आहे हे पाहून जे.आर.डी. प्रभावित झाले. आजीची तब्येत बिघडल्यामुळे तिला भेटायला भारतात आलेल्या रतन यांना जे.आर.डी. यांनी टाटा उद्योग समूहामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. १९६२ च्या डिसेंबर महिन्यात रतन टाटा समूहात दाखल झाले, मात्र समूहाच्या परंपरेनुसार ६२ ते ७१ त्यांना विविध कंपन्यांमध्ये काम करण्यास सांगण्यात आले. जमशेदपूरच्या टाटा स्टीलमध्ये अगदी कोळसा उचलण्यापासून ते भट्टीपाशी काम करण्यापर्यंतचे सर्व अनुभव घेतल्यानंतरच १९७१ मध्ये त्यांच्याकडे टाटा समूहातील नेल्को या कंपनीची धुरा सोपविण्यात आली. नेल्को ही त्यावेळी तोट्यात चालणारी कंपनी होती. रेडिओ आणि टेलिव्हिजनचे उत्पादन करणारी ही कंपनी पुढील तीन वर्षांमध्ये स्वतःच्या पायावर उभी करण्यात रतन टाटा यांनी यश मिळविले. संपूर्ण बाजारपेठेतील नेल्कोचा हिस्सा दोन टक्क्यांवरून वीस टक्के झाला, पण देशात आणीबाणी जाहीर झाली. पाठोपाठ आलेल्या मंदीमध्ये नेल्कोला आपल्या कामगारांच्या मागण्या मान्य करण्यात अपयश आले आणि ही कंपनी बंद पडली. रतन टाटा यांना अनुभवाला आलेले ते पहिले अपयश होते.

१९७७ मध्ये रतन टाटांवर एम्प्रेस मिल या टाटा समूहातील बंद पडावयास आलेल्या मिलची जबाबदारी सोपविण्यात आली. एम्प्रेस मिलच्या यंत्रसामग्रीमध्ये अनेक वर्षांमध्ये गुंतवणूक करण्यात आली नव्हती. कामगारांची संख्याही मोठी आणि त्याच्या तुलनेत उत्पादन तूटपुंजे असे चित्र असलेल्या या मिलमध्ये पन्नास लाख रुपयांची गुंतवणूक करण्याची विनंती रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहाला केली, पण नानी पालखीवाला, अजित केरकर आणि रुसी मोदी या संचालकांनी त्याला विरोध केल्याने अखेर ही मिलही बंद करण्यात आली. रतन टाटांच्या नावावर दुसरे अपयश जमा झाले. या सर्व प्रकारामुळे रतन टाटा चांगलेच दुखावले गेले होते, पण त्याचबरोबर अनुभवाच्या शाळेमध्ये बरेच काही शिकले होते. १९८१ मध्ये जे.आर.डी. टाटा यांनी त्यांच्याकडे टाटा इंडस्टीजची सूत्रे सोपविली. त्याच वेळेस ते त्यांचे वारसदार आणि टाटा उद्योगसमूहाचे भावी प्रमुख असणार हे स्पष्ट झाले होते. १९९१ मध्ये जे.आर.डी. यांनी स्वतःच उद्योगसमूहाची सर्व सूत्रे रतन टाटांकडे सोपवून निवृत्ती पत्करली.

त्यानंतर सुरू झालेली यशाची मालिका आणि नवे विक्रम अजूनही सुरूच आहेत. कोरस, जग्वार, टेटली आणि लँड रोव्हर सारख्या जगातल्या नामांकित कंपन्या टाटांनी खरेदी केल्या. त्यात २००० मध्ये त्यांनी टाटा टी मिळवून टेटली विकत घेतली आणि जगातील सर्वात मोठी टी बेग्ज बनवणारी कंपनी निर्माण केली. २००४ मध्ये साऊथ कोरिया मधील डेवू कमर्शियल व्हेईकलला रतन टाटा यांनी विकत घेतले. टाटा मोटर्स घेऊन जग्वार लँड रोव्हर विकत घेतली आणि टाटा स्टील घेऊन कोरस कंपनीचे अधिग्रहण केले. २००७ मध्ये टाटा ने लंडनमधील कोरस ग्रुप ही स्टील कंपनी विकत घेतली, नंतर तिचे नाव टाटा स्टिल युरोप ठेवण्यात आले. २००८ मध्ये टाटाने कॉर्नेलला ५० दशलक्ष डॉलर भेट दिले, जे विद्यापीठाच्या इतिहासातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय देणगीदार बनले. याच काळात टाटा समूहाचे तत्कालीन प्रमुख जे.आर.डी. टाटा यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यांनी मोठ्या प्रमाणावर भारत-केंद्री गटातील टाटा समूहाला जागतिक व्यवसायात रूपांतरित करण्याच्या प्रयत्न केला.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

या भरारीनं देशातल्या तरुणांना नवी ऊर्जा दिली. 'मोठी स्वप्न पाहाणं आणि ती प्रत्यक्षात आणणं' हा रतन टाटांचा स्वभाव होता. याच स्वप्नांमधून इंडिगो आणि नॅनोची निर्मिती झाली आणि कुठलीच गोष्ट अशक्य नाही, हे सुध्दा टाटांनी कतृत्वाने सिद्ध करुन दाखविले. हे यश मिळवत असतांना टाटांनी कधीच आपल्या मुल्यांशी तडजोड केली नाही. यामुळंच सचोटी, गुणवत्ता म्हणजे टाटा हे समीकरण तयार झालंय. निवृत्तीनंतर ते नवउद्योजकांना प्रोत्साहन देत असतांना त्यांना श्वासोच्छवासामुळे गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि ७ ऑक्टोबर २०२४ पासून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. वय-संबंधित समस्यांमुळे ९ ऑक्टोबर २०२४ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकार आणि झारखंड सरकारने एक दिवसाचा शोक जाहीर केला. १० ऑक्टोबर रोजी टाटा यांचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंतिम संस्कारादरम्यान त्यांना लष्करी आणि २१ तोफांची सलामी देण्यात आली. मुंबई पोलिसांनी समारंभपूर्वक 'गार्ड ऑफ ऑनर' दिला आणि त्यांचे पार्थिव भारतीय ध्वजात गुंडाळले गेले.

पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनाने संपूर्ण देश हळहळला. तांत्रिक, औद्योगिक सर्वच क्षेत्रात टाटा समूहाचे नाव अग्रणी आहे. त्यांनी अनेकांना कौशल्य प्रदान करून रोजगार दिलेला आहे तसेच, त्यांचे विविध क्षेत्रांच्या व उद्योगांच्या विकासासाठी दिलेले योगदान हे अतुलनीय आहे, त्यामुळे भारतातील पहिला कौशल्य विद्यापीठास त्यांचे नाव मिळावे ही अतिशय सन्मानाची गोष्ट आहे. त्याचबरोबर नवीन उद्योगांना सुद्धा त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेऊन सहकार्य केले. ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या स्मृतींचे जतन करण्यासाठी आणि उद्योग क्षेत्रातील या महान विभूतीच्या कार्याला आदरांजली देण्याच्या उद्देशाने नुकतेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. 'पद्माविभूषण रतन टाटा कौशल्य विद्यापीठ' असे या विद्यापीठाचे नाव असेल. या नामकरणामुळे विद्यापीठाच्या माध्यमातून होणाऱ्या तांत्रिक प्रगतीस चालना मिळेल आणि युवकांना रतन टाटा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठात शिक्षण घेण्याचा अभिमान वाटेल. या विद्यापीठाच्या माध्यमातून उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवणे तसेच नवोदितांच्या संकल्पनांना बळ देण्याचे उद्दिष्ट आहे. हा उद्देश रतन टाटा यांच्या विचारांचा आरसा असून त्याचे आचरण म्हणजेच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली आहे. देशातील एक आदर्श व्यक्तिमत्व, सुप्रसिद्ध उद्योगपती व टाटा समूहाचे अध्यक्ष रतनजी टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

# डोंबिवलीत ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलींद जाधव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक संवर्धन संस्थेच्या वतीने डोंबिवलीत ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, इंदिरा गांधी चौक, डोंबिवली पूर्व येथिल बाबासाहेबांच्या स्मरकासमोर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समता सैनिक दलातर्फे बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे उपआयुक्त शैलेश दोंदे उपस्थित होते. या कार्यक्रमात डोंबिवलीतील भारतीय बौद्ध महासभा समता, सैनिक दल, बहुजन विचार मंच या संस्थांचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र ठोके आणि भारतीय बौद्ध महासभा महिला डोंबिवली शहराध्यक्ष आम्रपाली कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. रविकिरण मस्के व सल्लागार प्रा. धनंजय पगारे, बौद्धाचार्य साहेबराव वाघ यांच्या हस्ते मेणबत्ती प्रज्ज्वन व पुष्प अर्पण करून महामानवांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. संस्थेचे सचिव गौतम सुतार गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिशरण, पंचशील व सूत्रपठन घेऊन उपस्थित सर्व उपासक, नागरिकांनी बाबासाहेबांना अभिवादन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शैलेश दोंदे यांनी मार्गदर्शन केले. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका उप-आयुक्त म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र ठोके यांच्या हस्ते शाल व पुष्प देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. बौद्धांची प्रगती केवळ आरक्षणामुळे झाली आहे हा इतर समाजाचा गैरसमज आहे, आरक्षणामुळे आमची कदाचित आर्थिक प्रगती झाली असेल पण सामाजिक, सांस्कृतिक आणि सर्वांगीण प्रगती ही केवळ बौद्ध धम्माच्या आचरणानामुळे झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा देऊन आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा मार्ग दिला त्यामुळे आम्ही प्रगती करू शकलो. असे भिवंडी मनपाचे उपायुक्त शैलेश दोंदे यांनी बोलतांना सांगितले. स्वाभिमान भारत कराटे चॅम्पियनशिप, मुलुंड येथे झालेल्या कराटे स्पर्धेत कबीर आनंद नवसागरे याला ब्राँझ मेडल मिळाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. धनंजय प्रगारे, प्रा. रविकिरण मस्के यांनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे नियोजन आणि स्मारकाचे सुशोभीकरण निलेश कांबळे, विजय इंगोले, बाजीराव माने, अर्जुन केदार, गणेश गायकवाड, अशोक गायकवाड, रवी इंगोले, सिद्धार्थ काळे, संजय गौतम या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केले. या कार्यक्रमाला गणेश अहिरे, दिनेश हिवराळे, रुस्तम कांबळे अशोक व्हावळे, आनंद नवसागरे, विश्वविकास गायकवाड, मिलिंद साळवे, प्रशांत टेकाळे, राजू काकडे, नितीन सोनवणे, तेजस कांबळे , किरण शिंदे,राहुल डोंगरे, प्रकाश पारवे, दीपक भालेराव इत्यादी विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सेवाभावी संस्थांचे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम सुतार व देवंगनाताई लोखंडे यांनी केले उपस्थितांचे आभार संस्थेचे खजिनदार दिनेश कांबळे यांनी व्यक्त केले. धम्मपालन गाथा घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# डुबेरे येथील जनता विद्यालयात हात धुवा दिन साजरा






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक डी. एच.जाधव, सोमनाथ पगार,कचेश्वर शिंदे उपस्थित होते.

मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी विद्यार्थ्यांना अस्वच्छतेमुळे होणारे आजार, स्वछतेचे महत्त्वहात धुण्याचे महत्त्व पटवून देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपशिक्षक सोमनाथ गिरी यांनी विद्यार्थ्यांना हात धुण्याच्या विविध पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. काही विद्यार्थ्यांचे हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले. सूत्रसंचालन सुनिल ससाणे यांनी केले.यावेळी अरुण डावरे,राजेंद्र गांगुर्डे, सीमा गोसावी, मारुती डगळे, रेवणनाथ कांगणे, जयश्री गोहाड रामदास वारुंगसे, संदीप पानसरे, रवि गोजरे, किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने, निवृत्ती बर्गे, संकेत जाधव आदींसह शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# निफाड येथील मोरे महाविद्यालयात डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील क.ग.दा मोरे महाविद्यालयात डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रवीण ढेपले हे होते ,याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून पत्रकार श्रीवास्तव उपस्थित होते याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना पत्रकार श्रीवास्तव म्हणाले की जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर अधिकाधिक ज्ञान मिळविले पाहिजे ज्ञान प्राप्तीसाठी पुस्तकांचे वाचन केले पाहिजे यश नक्की मिळेल, यावेळी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय विकसित होण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले ,याप्रसंगी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रोहिदास शिंदे यांनी आपले मनोगतात वाचन संस्कृतीचे महत्त्व समजावून सांगितले, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपाली शेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले आभार रवींद्र मतसागर यांनी मानले ,याप्रसंगी डॉ. सुजाण लरेंनसिया ,सध्या केदार, नितीन कुंदे ,डॉ. सुरेखा जाधव, डॉ, बी सी आहेर, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. निकेतन महाले, किरण ढगे ,ऋचा कापसे, सोपान मोरे व सर्व प्राध्यापक, सेवकवृंद, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### बंद घराचा कडी-कोंयडा तोडून रक्कम पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : बंद घराचा कडी कोंयडा उचकटून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करीत घरातील कपाटामध्ये ठेवलेली सात हजार पाचशे रुपयांची रोख रक्कम चोरून नेली आहे. ही घटना १५ ऑक्टोंबर रोजी दुपारी तीन ते सव्वातीनच्या दरम्यान हब्बू वस्ती जुना देगाव नाका येथे घडली. याप्रकरणी ब्रह्मदेव अर्जुन साळवे (वय-४७,रा.हब्बू वस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहे.

### विवाहितेचा छळ करून मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहिता ही सासरी नांदत असताना तुझ्या आईने माझ्या मनासारखा हुंडा दिला नाही,तरी तू आता तुझ्या आईकडून हुडा म्हणून पैसे व सोने घेऊन ये असे म्हणत वारंवार मानसिक त्रास देऊन विवाहितेला मारहाण केली.त्यानंतर तू मला घटस्फोट दे नाहीतर तुला मारून टाकेल अशी धमकी दिल्याची फिर्याद स्नेहा जितेश जाधव (वय-३२,रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर चार) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती जितेश शशिकांत जाधव (वय-३७,रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ४) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ७ डिसेंबर २००८ ते १ जुन २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास मपोह.वाघ या करीत आहेत.

### धोत्रेकर वस्ती जवळ अपघात; वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : धोत्रेकर वस्तीजवळ दुचाकी महिंद्रा पिकअप वाहनांच्या धडकेत तरुण जखमी झाल्याची घटना १५ ऑक्टोंबर रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी राज प्रल्हाद कतारी (वय-२५-,रा. भवानी पेठ,मड्डी वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून महिंद्रा पिकअप क्रमांक एमएच.१३.डीक्यू.८८०३ या क्रमांकाच्या वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व त्यांचा चुलत भाऊ अनिल कतारी असे मिळून दुचाकी क्रमांक एमएच.१३.एवी.८२८१ यावरून शेळगी येथे घराकडे जात होते त्यावेळी शेळगी ब्रिज ते जुना तुळजापूर नाका या सर्विस रोडने मागून येणारी वरील क्रमांकाची महिंद्रा पिकअप वाहन यातील चालकाने भरधाव वेगाने गाडी चालवून फिर्यादी यांच्या गाडीला मागून धडक दिली.त्यात फिर्यादी यांचा भाऊ याला डोक्याला लागल्याने तो बेशुद्ध झाला.तसेच फिर्यादी राज यांना हाताला,तोंडाला व सर्व अंगास मार लागला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहे.

# माणसाने ग्रंथाची साथ ठेवली तर अज्ञानाच्या रात्री उजळून निघतील : प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख

## माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस हा वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : बाह्य व्यक्तिमत्त्वापेक्षा आंतरिक व्यक्तिमत्त्वाचा विकास अधिक महत्त्वाचा असतो बाह्य व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी अन्नाची गरज असते, तर आंतरिक व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी मनावर संस्कार करावे लागतात. मनाची मशागत करावी लागते त्यासाठी माणसाने ग्रंथाची साथ ठेवली तर अज्ञानाच्या रात्री उजळून निघतील, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस हा वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये व्याख्यानाचा व शहरातील सार्वजनिक वाचनालय ग्रंथपालांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमप्रसंगी मुख्य व्याख्याते, मराठी भाषा तज्ञ, साहित्यिक प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी वरील मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य व्याख्याते साहित्यिक प्रो. डॉ. शिवाजीराव मारुती देशमुख तर ग्रंथ मित्र कुंडलिक मोरे, निवासी तहसीलदार श्रीकांत पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे आदींची उपस्थिती होती.

**जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हीआयपी सभागृहामध्ये मा. मनीषा कुंभार निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर मा. अंजली मरोळ सदस्य सचिव मराठी भाषा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून दीप प्रज्वलन करून सदर कार्यक्रमास सुरुवात झाली.**

याप्रसंगी देशमुख आपल्या शैलीत व्यक्त होताना माणसाला समाजाची ज्ञानाची गरज भागवण्यासाठी वाचन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. व्यक्तीला वाचनाची सवय जडली पाहिजे, जगात ज्ञानाची व ज्ञानवंत माणसांची पूजा केली जाते. ज्ञानावरूनच माणसाची समाजाची, देशाची उंची मोजली जाते. प्रत्येक क्षेत्रातील ज्ञान मिळवण्यासाठी व्यक्तीने भरपूर वाचन केले पाहिजे, वाचन ही माणसाची बौद्धिक व मानसिक गरज आहे. आजचे युग हे ज्ञानाचे तंत्रज्ञानाचे माहितीचे विकासाचे संगणकाचे आणि प्रगतीचे आहे अशा युगात व्यक्तीच्या मनावर संस्कार होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

आज वाचन संस्कृती पासून समाज दूर जातो की काय अशी शंका घेतली जाते म्हणून वाचन संस्कृती रुजवणे, वाढवणे व विकसित करणे, नवनव्या ज्ञानाची शोध घेणारे वृत्ती जोपासणे आवश्यक आहे, म्हणून माणसांनी ग्रंथाची साथ ठेवली तर अज्ञानाच्या रात्री उजळून निघतात याकरीता वाचकांनी ग्रंथाची मैत्री केली पाहिजे ती टिकवली पाहिजे. वाचनाने विचाराने वर्तनावर नियंत्रण ठेवता येते. म्हणून उत्तम वाचनाचा माणूस जगात कोठेही सुखी राहू शकतो असे विचार प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी या कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले.

ग्रंथालय चळवळीतील ज्येष्ठ ग्रंथ मित्र कुंडलिक मोरे यांनी ग्रंथपाल हा वाचनाची गोडी निर्माण करणारा व वाचन चळवळ वृद्धिगत करणारा अत्यंत जबाबदार व्यक्ती असून तो आजही दुर्लक्षित असल्याचे जाणून दिले.




अध्यक्षीय भाषणात मा. मनीषा कुंभार निवासी उपजिल्हाधिकारी यांनी वाचनाने माणसाचे अज्ञान दूर होते तर माणसाला प्रगतीपथावर घेऊन जाते आजचे व्याख्यान हे निश्चित आपल्या सर्वांना विचार करायला लावणारे असून या व्याख्यानातून निश्चितच चांगला संदेश मिळाला आहे असे प्रतिपादन मा. मनीषा कुंभार यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी माननीय अंजली मरोड सदस्य सचिव मराठी भाषा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्या व मान्यवरांच्या शुभ हस्ते शहरांमधील सर्व ग्रंथपालांचा ग्रंथ व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी केले तर आभारप्रदर्शन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रमास अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे प्रोफेसर डॉ. शिवाजीराव शिंदे ,सहाय्यक कुलसचिव, प्रो. सुहास पुजारी, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, तसेच शहरातील सर्व ग्रंथपाल वर्ग जिल्हाधिकारी कार्यालय, ग्रंथालय अधिकारी कार्यालय मधील कर्मचारी उपस्थित होते.

# स्वा. सावरकर विद्यालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक संस्थेचे, स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप एस.डी. हे होते तर .व्यासपीठावर विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक नितीन सावकार, संजय निकम, लहनु शिंदे, किरण भडांगे आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली असून व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम विषयी अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.शिक्षक मनोगतामध्ये श्रीम.पाटील यांनी मिसाईल मॅन डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे विषयी सखोल अशी माहिती सांगितली , सांस्कृतिक प्रमुख.सुधाकर जी निकम यांनी डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम विषयी सुंदर अशी कविता सादर करून विद्यार्थ्यांची मनी जिंकली. अध्यक्ष मनोगतात सानप एस.डी.म्हणाले की स्वप्न ती नसतात जी आपण झोपेत पाहतो, स्वप्न ती असतात जी आपल्याला झोपू देत नाही, त्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पदे भूषविली, विद्यालयाचे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले, सूत्रसंचालन व आभार इयत्ता नववी कु .श्रद्धा दरोगे व कुयटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू-भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी आदींनी परिश्रम घेतले.

# आता कोतवाल नव्हे... तर महसूल सेवक... म्हणा..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेच्या वतीने विविध मागण्या संदर्भात धरणे अदोलन व काम बंद अदोलन करण्यात आले याची फलश्रुती म्हणून काही मागण्या शासन मान्य करून शासन निर्णय निरगिमत केले आहे , ..संघटनेच्या अदोलन , संपास यश मिळाले असे महिती विठ्ठल गुरव जिल्हाध्यक्ष सोलापूर तथा पुणे विभागीय अध्यक्ष यांनी दिली आहे...

## राज्य शासन निर्णयाचे स्वागत

बिटिश काळापासून मुघलकालीन पदनाम बदलण्याचे संघटनेच्या मागण्या होत,कोतवाल ऐवजी महसूल सेवक करण्यात यावा या मागण्या यश मिळाले , कोतवाल पदनाम बदलून आता महसूल सेवक करण्यात आले आहे ,या शासन निर्णय स्वागत केले आहे,

**महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेच्या मागण्या :**

१) अनुकंपा , २) कोतवाल पदनाम बदलून महसूल सेवक, ३) अटल पेशन्स, ४) अग्रीम दहा हजार रुपये, ५) १० टकके मानधन वाढ असे विविध मागण्या मान्य केले असून या मागण्या शासन निर्णय स्वागत राज्य संघटनेच्या नेते राज्य अध्यक्ष शिवप्रसाद देवणे, नामदेव शिंदे, सोमनाथ गवळी, विठ्ठल गुरव, कलीदास गेडाम रोशन जोगे राहुल तोडकरी मलिनाथ बाळगी, अनिल जाधव प्रविण बाबर समाधान सुर्यगंध, नवनाथ इंगोले, धानया हिरेमठ, बाळासाहेब खेदाड , नवनाथ गजगे शहाजी हुलगे , सुदर्शन गुरव, अवधूत पुजारी, इतर पदाधिकारी या निर्णय स्वागत केले आहे.

महाराष्ट्र राज्य संघटनेच्या मुख्य मागण्या चतुर्थी श्रेणी होते, पण मानधन (वेतन )वाढ केले आहे, या सोबत ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे, अनुकंपा, अटल पेशन्स, पदनाम महसूल सेवक अग्रिम या निर्णय स्वागत विठ्ठल गुरव जिल्हाध्यक्ष सोलापूर तथा पुणे विभागीय अध्यक्ष यांनी केले आहे.

# तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत युवराज गायकवाड प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग/प्रतिनिधी : टॅलेंट हंट स्पर्धेमध्ये शेळगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या युवराज गायकवाड याने तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे .त्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे .



सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागा मार्फत चालू असलेल्या विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास (टॅलेंट हंट ) स्पर्धेमध्ये बार्शी तालुक्यातील खांडवी येथे १६ आक्टोबर रोजी तालुकास्तरीय निबंध स्पर्धा संपन्न झाल्या.

या स्पर्धेमध्ये शेळगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा चौथीतील विद्यार्थि युवराज सज्जन बाबासाहेब गायकवाड याने प्रथम क्रमांक मिळवला आहे .

१६ केंद्रातून दोन अशा ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. वर्गशिक्षिका वैशाली नावगुडे व मुख्याध्यापिका शैलेजा उकिरडे यांचे मार्गदर्शन लाभले . तिच्या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सुहास गुरव केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर जाधव दिपक कापसे बालाजी गुंड यांनी अभिनंदन केले .

# भादाणे येथे सामाजिक, शैक्षणिक मार्गदर्शन दसरा मेळावा मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांच्या नेतृत्वाखाली सालाबाद प्रमाणे याही वर्षी शैक्षणिक सामाजिक मार्गदर्शन दसरा मेळावा मोठ्या उत्साहाने पार पाडला. यावेळी जिजाऊ संघटना व लावण्या फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना, तसेच दहावी बारावी गुणवंत विद्यार्थ्यांना , अशासेविका, सुपरवायझर अंगणवाडी सेविका मदतनीस ,पोलीस पाटील ,बचत गटातील सीआरपी बचत गटातील व्यवस्थापक अध्यक्ष महिला, पत्रकार ग्रामपंचायत कर्मचारी, लिपिक , शिपाई तर सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक क्षेत्रातील नागरीकांना सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद गटातील सदस्य ,ग्रामपंचायत भादांणे कमिटी तर प्रमुख भादाणे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक जाधव, सुदाम भोईर, उल्हास भोईर ,जिजाऊ सदस्य नवनाथ वाघेरे ,सूरज शेलार विशाल शेलार ,ज्ञानेश्वर गोरले ,शरद जाधव,मनीषा काकडे,कमलाकर विशे.तर आदि उपस्थित होते. जे वर्षभर प्रामाणिकपणे काम करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे ही सामाजिक बांधिलकी मी जपत आहे.असे सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी बोलतांना सांगितले. यावेळी जिजाऊ संघटना लावण्या फाउंडेशन व पंकज भोईर यांचे यांचे आभार व्यक्त करण्यात आभार व्यक्त करण्यात आले.



## निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम केला जाहीर

## निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली माहिती

# पंढरपूर विधानसभा मतदार संघात ३ लाख ७१ हजार २९० मतदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. पंढरपूर विधानसभा मतदार संघात १ लाख ९० हजार १३५ पुरुष मतदार तर १ लाख ८० हजार ५७७ स्त्री मतदार व इतर मतदार २६ असे एकूण ३ लाख ७१ हजार २९० मतदार आहेत. तसेच ५५२ सैनिक मतदार आहेत. विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ३५७ मतदान केंद्रे आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी १ याप्रमाणे ३५७ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नेमण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.




पंढरपूर विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी ३६, भरारी पथक १८, स्थिर पथक १६, व्हिडीओ पहाणी पथक १४, व्हिडीओ सर्वेक्षण पथक २ तसेच समन्वय अधिकारी म्हणून ४० नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. क्षेत्रीय अधिकारी यांच्या नेमून दिलेल्या गावामध्ये संयुक्त भेटी झालेल्या असून त्याबाबतचे अहवाल कार्यालयास प्राप्त झाले आहेत. तसेच यापूर्वी सर्व मतदान केंद्रांची सुविधा बाबतची तपासणी पर्यवेक्षक व मंडल अधिकारी यांच्याकडून करून घेण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया निर्भयपणे पार पडावी म्हणून तक्रार निवारण केंद्र, सुविधा ॲप, टपाली मतदान सुविधा, भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडीओ पहाणी पथके, व्हिडीओ सर्वेक्षण पथक तैनात करण्यात येणार आहेत.

**मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर येथे निवडणूक नियंत्रण व समन्वय कक्ष व कंट्रोल रुम तयार करण्यात आली आहे. याव्दारे सर्व पथकांवर नजर ठेवण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आचारसंहितेबाबत काही तक्रारी असल्यास सी व्हिजील ॲप वापरण्यात येत आहे. तर उमेदवारांना लागणाऱ्या सर्व परवानग्या घेण्यासाठी एक खिडकी योजना व सुविधा प्रणालीव्दारे अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांनी मतदार नोंदणी, मतदार यादीत नाव तपासणी यासाठी व्होटर हेल्पिंग ॲपचा करु शकता.**

विधानसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षावरील मतदार संख्या ही ५३३४ आहे. तर अपंग मतदार(पी.डब्ल्युडी) २७१० आहे. ज्यांना मतदान केंद्रावर मतदानासाठी येणे शक्य नाही, अशा मतदारांना होम वोटिंग सुविधा देण्यात येणार आहे. त्यासाठी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. पंढरपूर मतदार संघात एकही केंद्र संवेदनशील नाही. तर ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे.

भारत निवडणूक आयोग यांनी जाहीर केल्याप्रमाणे पंढरपूर विधानसभा मतदार संघासाठी आदर्श आचार संहिता दि. १५ ऑक्टो. रोजी पूर्वलक्षी प्रभावाने लागू झालेली आहे. दि. २२ ऑक्टो. रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार अहे. नामनिर्देशन २३ ते २९ ऑक्टो. पर्यंत, अर्जाची छानणी ३० ऑक्टो. पर्यंत, उमेदवारी अर्ज माघार घेण्याची अंतिम तारीख ४ नोव्हेंबर,दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. मतमोजणी दि. २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तर निवडणूक प्रक्रिया दि. २५ नोव्हेंबर पर्यंत पुर्ण करण्यात येणार आहे. आदर्श आचार संहिता जाहीर झाल्यापासून पंढरपूर विधानसभा मतदार संघातील सर्व राजकीय पक्षांचे भित्तीपत्रके, घोषवाक्ये, पोस्टर्स, बॅनर्स, झेंडे तातडीने यंत्रणे मार्फत हटविण्याचे काम चालू आहे.

दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रावर येण्यासाठी व्हिलचेअर, रॅम्पची सुविधा, उमेदवारांसाठी अर्ज भरणे सोपे जावे म्हणून सुविधा ॲपची मदत घेता येणार आहे. ५० टक्के मतदान केंद्रांवर सीसीटिव्ही सुविधा उपल्बध करण्यात आली आहे. उमेदवारांचा निवडणूक खर्च तीन वेळा तपासला जाणार आहे. सोशल मिडीयाचा वापर उमेदवार व मतदारांनी जपून वापर करावा असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी यावेळी केले.

## थोडक्यात...

### मुंबई येथील लोखंडवाला येथील बहुमजली इमारतीला आग, तिघांचा मृत्यू

मुंबई : अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला संकुलातील एका इमारतीत लागलेल्या आगीत तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन वृद्धांचा समावेश आहे. दहाव्या मजल्यावरील एका सदनिकेत ही आग लागली होती. आग कशामुळे लागली याबाबत अद्याप तपास सुरू आहे. या आगीबाबत संशय व्यक्त होत असून या प्रकरणी पोलिसही तपास करण्यात येणार आहे. लोखंडवाला संकुलतील 'रिया पॅलेस' या १४ मजली इमारतीमधील दहाव्या मजल्यावरील एका सदनिकेत सकाळी ७.३० च्या सुमारास आग लागली होती. आगीचे वृत्त समजताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य हाती घेतले. सकाळी ९ च्या सुमारास आग विझवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. आग लागलेल्या सदनिकेतील तिघे होरपळले होते. त्यांना कुपर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. चंद्रप्रकाश सोनी (७४), कांता सोनी (७४) आणि पेलूबेटा (४५) अशी मृतांची नावे आहेत. दुर्घटनाग्रस्त सदनिकेमध्ये एक वृद्ध जोडपे वास्तव्यास होते. त्यांच्यासोबत एक नोकरही राहात होता. या जोडप्याचा एक मुलगा परदेशात वास्तव्यास आहे. सकाळी आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर शेजाऱ्यांनी दरवाजा ठोठावला, मात्र दरवाजा उघडता येत नव्हता. अग्निशमन दलाने आग विझवल्यानंतर घरात प्रवेश केला असता वृद्ध जोडपे होरपळलेल्या अवस्थेत आढळले. तर दुसऱ्या खोलीत नोकर होता. गुदमरल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची शक्यता आहे. दरम्यान, ही आग विझवताना काही संशयास्पद बाबी अग्निशमन दलाच्या जवानांच्या निदर्शनास आल्या असून त्याबाबतची माहिती पोलिसांना देण्यात असल्याचे अग्निशमन दलातील सूत्रांनी सांगितले. ही आग विद्युत बिघाडामुळे लागल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही.

# उद्योजक घडविण्यासाठी रिपब्लिकन पक्षात उद्योग सेलची स्थापना करणार

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सुशीक्षीत बेरोजगार तरुण नोकरीचा शोध घेत असतात.बेरोजगार तरुणांनी नोकरीची संधी मागण्यापेक्षा नोकरी देणारे उद्योजक झाले पाहिजे. सरकारी आणि खाजगी नोकरी सर्वांनाच मिळेल असे नाही,त्यामुळे तरुणांनी उद्योगाकडे वळले पाहिजे.बेरोजगार तरुणांना उद्योग व्यवसाय उभारण्यासाठी सरकारी योजनांची माहिती मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देऊन उद्येजक घडविण्यासाठी रिपब्लिकन पक्ष उद्योग सेलची स्थापना कारणार आहे अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज मुंबईत दिली.

रिपब्लिकन पक्षातील कार्यकर्ते हे अन्य पक्षाच्या तुलनेत आर्थीकदृष्ट्या सक्षम नाहीत.दलित,बहुजन वर्गातुन येणाऱ्या कार्यकर्त्यांना राज्य सरकार,केंद्र सरकारच्या विविध उद्योगाला चालना देणाऱ्या योजनांची माहिती देऊन त्यासाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील उद्योजक घडविण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचा उद्योगसेल काम करेल.बँकामधुन कर्ज मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नियमावली पूर्ततेबाबत रिपब्लिकन उद्योगसेल मार्गदर्शन करेल. रिपब्लिकन पक्षात उद्योगसेल स्थापन करण्याबाबत रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरोदे यांच्या अध्यक्षतेत नुकतीच लोणावळ्यात एक बैठक संपन्न झाली.त्यात राज्यभरातील उद्योजक उपस्थित होते.या बैठकीस केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.या बैठकीत रिपब्लिकन पक्षात उद्योगसेल स्थापन करण्याचा निर्णय सर्वसंमतीने घेण्यात आल्याची माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली.




# अखेर सिंदखेड राजा–शेगाव भक्तिमार्ग रद्द

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

देऊळगाव राजा / दिलीप वनवे : अंढेरा :- अंढेरा व परिसरातील शेतकऱ्यांनी सिंदखेड राजा ते शेगाव होऊ घातलेल्या भक्ति महामार्गाला प्रखरपणे विरोध केला अनेक शेतकऱ्यांनी आपल्या सह्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांना दिले होते. तसेच प्शेतकऱ्यांनी अंढेरा येथे श्री.औंढेश्वर मंदिरात हा रस्ता होऊ नये यासाठी थाळीनाद आंदोलन सुद्धा केले होते. जवळपास ५००० कोटी रुपये खर्चून फारशी आवश्यकता नसणारा हा सिंदखेड राजा शेगाव भक्त महामार्ग सरकार करवी होऊ घातला होता या महामार्गाच्या विरोधात शेतकऱ्यांच्या मनामध्ये तीव्र भावना होत्या. शेतकऱ्यांची सुपीक तसेच शेडनेट ची जमीन अत्यल्प दरामध्ये घेऊन शेतकऱ्यांचे यामध्ये फार मोठे आर्थिक नुकसान होणार होते. तसेच या महामार्गामुळे अनेक शेतकरी भूमिहीन सुद्धा होणार होते. उपजीविकेचा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहणार होता त्यामुळे हा भक्ति महामार्ग होऊच नये, अशा तीव्र भावना शेतकऱ्यांमध्ये होत्या. अंढेरा सह परिसरातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी या होऊ घातलेल्या सिंदखेडराजा शेगाव भक्ति महामार्गाला प्रचंड विरोध केला तसेच अंढेरा येथील शेतकऱ्यांनी बुलढाणा येथे झालेल्या आत्मक्लेष आंदोलनाला फार मोठ्या संख्येने पाठिंबा दर्शवलेला होता आणि अखेर त्यांच्या विरोधाला यश आले आणि १४ ऑक्टोबर रोजी शासनाने जीआर काढत सिंदखेड राजा ते शेगाव हा भक्ती महामार्ग रद्द करत असल्याचे जाहीर केले. त्यामुळे आनंदित होऊन कृती समितीतील शेतकरी दिलीपराव सानप, प्रगतीशील शेतकरी विनोद मोतीराम चव्हाण , राजु सानप, रवींद्र तेजनकर,किसन वैद्य, सुरेश बनसोडे, संतोष नागरे, गणेश ढाकणे,शिवाजी डोईफोडे, विष्णू नागरे, श्रीराम नागरे, सुरेश बनसोडे ,रामकिसन सानप, सुधाकर सानप राधाकिसन ढाकणे,महेश तेजनकर सह मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. व सिंदखेडराजा ते शेगांव भक्तिमार्ग रद्द करण्यासाठी सर्वांनी जे प्रत्यक्ष ,अप्रत्यक्ष सहकार्य,मदत व प्रयत्न केले त्या सर्वांचे जाहीर आभार मानले . शेवटी शेतकरी एकजुटीचा विजय झाला.व काळी आई शेतकऱ्यांच्या हातून जाण्यापासून वाचली.याचा अत्यानंद या शेतकऱ्यांना झाला.



**शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाला यश**

# शस्त्रधारी इसम निफाड पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरात व परिसरात शारदीय नवरात्र उत्सव आनंदाने साजरा होत असताना याप्रसंगी अनेक मंडळांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते या गर्दीत निफाड पोलिसांनी एका शस्त्रधारी इस्मस पकडले असून निफाड पोलिसांच्या या कर्तव्यदक्षतेमुळे पुढील अनर्थ टळला आहे

याबद्दल पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती अशी की नवरात्र उत्सव काळात दिनांक ९/ १० /२०२४ रोजी रात्रीच्या वेळी पोलीस सागर सारंगधर ,गोविंद खुळे, संजय गुरव ,नितीन सांगळे, तसेच होमगार्ड हंडोरे ,पठाडे हे रायगड ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आनंद मेळ्यामध्ये बंदोबस्त देत असताना एक २४ वर्षाचा ईसम आकाश गोविंद गायकवाड रा. जळगाव फाटा ता. निफाड हा विनाकारण लोकांशी हुज्जत घालताना दिसून आला .ही माहिती मिळतात पोलिसांनी त्या इसमास वाद करू नको यात्रेच्या बाहेर जा असे समजावून सांगत असताना या इसमाने पोलीसांशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली सदर इसमाचे संशयास्पद वागणे बघून त्याच्या अंगाची झडती घेतले असता त्याचे कमरेला धारदार शस्त्र सापडले असून त्याला पोलीस ठाण्यात नेण्यात आले असून त्याचे वरती रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस करतं आहे



# मातृसत्ताक संस्कृती भोंडवाई कार्यक्रम उत्साहात साजरा

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

मोखाडा/प्रतिनिधी : आदिवासी युवा समाज फाउंडेशन व ग्रामस्थ मौजे वासिंद ता मोखाडा याठिकाणी सालाबाद प्रमाणे मातृसत्ताक संस्कृती भोंडवाई कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांस धुळे येथून नजूबाई गावित व त्यांची टीम. तसेच मुंबई येथून मंदाताई कचरे. मीना ताई कोंडार. सुशीलाताई कोकणे. नाशिक इगतपुरी वरून बेबीताई तेलम व त्यांची टीम. शहापूर वरून सुनिताताई आमले व त्यांची टीम. विमल राजेंद्र जागले व त्यांची टीम तसेच मुरबाड वरून अनेक निष्ठावंत महिलांनी भाग घेऊन आदिवासी महिला संस्कृतीची जाणीव करून महिला शक्ती काय असते ते दाखवून दिले.कार्यक्रम अध्यक्ष प्रमुख पाहुणे. सूत्रसंचालन मनोगते. आणि स्टेज मान्यवर सर्व भूमिका महिलांनीच सादर केल्या. सदर कार्यक्रमांस पंचक्रोशीतील महिलांनी सहभाग घेतला. जोगलवाडी. कारेगाव कोचाळे करोळ उधले सायदे गोमघर वासिंद भगतपाडा भावली अशा अनेक ठिकाणाहून महिलापथकांनी सहभाग नोंदवून आपले कार्यक्रम सादर केले. राणी दुर्गावती झलकारी. अजूनही आहेत. पण समाज त्यांना पुढे घेत नाही याची जाणीव झाली. जल जंगल जमीन. आणि आदिवासी इतिहास संस्कृती देव गाणी नाच सण लग्न विधी इत्यादी अनेक विषयावर मनोगते होऊन कार्यक्रम पार पडला.सदर कार्यक्रमास समता संघर्ष संघटन संघटक अविनाश दोंदे, बहुजन नेते रवींद्र चंदने, आद्यक्रांतिवीर राघोजी भांगरे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच अध्यक्ष संजय इधे सर, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल बांगर मेजर, कोंडू सारकते मेजर, हे उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रमण संघांचे अध्यक्ष आनंद कामडी सर, प्रभाकर शिद सर, आदिवासी युवा समाज संघांचे महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र जागले सर, घनश्याम फसाळे यांनी मेहनत घेतली.



# पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडून, विधानसभा निवडणुकीला प्राधान्य द्या : प्रा.संजय खडसे

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर २४- सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची आज दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सिंदखेड राजा प्रा.संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. आजच्या बैठकीमध्ये प्रा. खडसे यांनी विधानसभा निवडणुकीच्या सर्व बाबींचा आढावा बैठकीमध्ये घेतला. पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडून, विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन प्रक्रिया पूर्ण करावी यासाठी मार्गदर्शन केले.

प्रा. खडसे यांनी आचारसंहितेचे पालन करताना कोण कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, निवडणुकीतील कर्मचारी अधिकाऱ्यांकडून कोणतीही चूक होऊ नये याची दक्षता घेण्याचे सुद्धा सर्वांना आवाहन केले.

मतदान अर्ज भरण्यापासून ते मतदान मोजणी पर्यंत पोलीस विभागाची भूमिका ही खूप महत्वाची आणि जबाबदारीची असते याबद्दल सांगण्यात आले. नामनिर्देशन करतेवेळी, अर्ज माघे घेतेवेळी, सभा, मोर्चे, प्रचार करताना पोलीस अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून आपली जबाबदारी पार पाडावी असे आवाहन प्रा. खडसे यांनी केले.

स्थिर सर्वेक्षण पथक हे दिनांक २२ ऑक्टोबर पासून कार्यान्वित होणार असून २४ तास हे पथक काम करेल. गाडीची तपासणी करणे, संशयास्पद वस्तू आढळल्यास त्या जप्त करणे इत्यादी कामे हे पथक करत असते. सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा तालुक्यासाठी प्रत्येकी २ असे एकूण ४ फिरते पथक स्थापन केले आहेत अशी माहिती प्रा. खडसे यांनी दिली.

बॅनर, झेंडे लावण्या संबंधिच्या परवानग्या आवश्यक असतील तसेच शस्त्र वापरासंबंधीच्या सूचना देण्यात आल्या.

आजच्या या सभेला वरिष्ठ पोलीस निरीक्षक देऊळगावराजा श्री. संतोष महल्ले, झख सिंदखेडराजा श्री. तुषार जाधव, झख किनगावराजा श्री. विनोद नरवाडे, झख आंढेरा श्री विकास पाटील, झडख सिंदखेड राजा श्री. बालाजी सानप, झडख डउ्झज कार्यालय देऊळगाव राजा श्री. विश्वनाथ राठोड तसेच इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



**स्वेरीमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'जागतिक विद्यार्थी दिन' साजरा**

**निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.अशोक नगरकर यांचे प्रतिपादन**

# देशाच्या विकासासाठी भारतरत्न डॉ.कलाम यांचा आदर्श घेतला पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'करिअर करत असताना अपयश आले तरी हरकत नाही, परंतू प्रयत्न मात्र सोडू नयेत. इंजिनिअरिंग पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या शोधात असाल तर संशोधनामध्ये नक्की करिअर करा. ज्यांना शिकण्याचे तंत्र माहीत नाही ते शिकूच शकत नाहीत या तंत्रानुसार डॉ. अब्दुल कलाम हे सामान्य माणसाकडे देखील बारकाईने लक्ष देत असत. डॉ.कलाम म्हणायचे 'माणूस मुळीच निवृत्त होत नसतो. जेंव्हा तुम्ही येथून निघून जाल तेंव्हाच तुम्ही निवृत्त व्हाल, तोपर्यंत आपल्या कार्यात सातत्य ठेवा.' नोकरी मिळवणे हा फार मोठा पराक्रम नाही पण गुणवत्तापूर्ण नोकरी मिळवणे यात मात्र कौशल्य आहे. संशोधन करताना आपले संशोधन हे पेटंटच्या दर्जापर्यंत घेऊन जाता आले पाहिजे. जर प्रॉब्लेम कळला तरच त्यातून संशोधन होत असते म्हणून छोट्या छोट्या संकल्पनातून मोठ-मोठ्या ध्येयाकडे जाता येते. जर देशाला पुढे न्यायचे असेल तर भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचा आदर्श घेतला पाहिजे.' असे प्रतिपादन डीआरडीओ तथा डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (संरक्षण, संशोधन आणि विकास संघटना) चे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.अशोक नगरकर यांनी केले.



**शास्त्रज्ञ डॉ. नगरकर यांच्या मागणीनुसार स्वेरीच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी पाच गुंठे जमिनीची मागणी केली असता डॉ. रोंगे सरांनी ती मागणी तात्काळ मान्य केली. आता 'येथून पुढे या स्वेरीच्या पाच गुंठ्यामध्ये संशोधनाचे कार्य स्वतंत्रपणे सुरु होईल.' अशी घोषणा स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी केली.**

भारताचे थोर शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ९३ व्या जयंती निमित्त पंढरपूर येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मध्यवर्ती असलेल्या खुल्या रंगमंचावर 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'जागतिक विद्यार्थी दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी शास्त्रज्ञ डॉ. अशोक नगरकर हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाचे माजी संचालक, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) माजी सदस्य त्याचबरोबर, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. एन. बी. पासलकर हे होते. याप्रसंगी थोर शास्त्रज्ञ तथा भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाराष्ट्र गीत, स्वेरी गीतानंतर प्रास्तविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'जागतिक विद्यार्थी दिन' याबाबत माहिती देवून 'देशभक्ती काय असते ती भारतरत्न डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या कार्यातून दिसून येते. करिअरच्या उज्वलतेसाठी कोणतीही माहिती लक्षपूर्वक ऐका आणि बारकाईने पहा' असा संदेश दिला. ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी म्हणाले की 'डॉ. रोंगे सरांनी येथे रत्ने उभी केली आहेत. त्यामुळे विचारवंतांची कमतरता नाही. आपण एवढा प्रयत्न केला पाहिजे की डोक्यातून घाम आला पाहिजे.' असे सांगून त्यांनी 'ड्रीम फाउंडेशन'च्या वाटचालीबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. कमलेश पंडे यांनी देखील मार्गदर्शन केले. यावेळी ड्रीम फाउंडेशन, आचार्य चाणक्य गुरुकुल आणि डॉ.कलाम कौशल्य विकास केंद्र, पुणे यांच्यातर्फे ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक अशोक कोर्टीकर, पंढरपुरातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डी.वाय. ओंबासे व शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्धल स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे या तिघांना 'राष्ट्र उभारणी प्रेरणा' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. एन. बी. पासलकर म्हणाले की, 'माझ्या जीवनात उद्योजक रतन टाटा आणि डॉ. अब्दुल कलाम सर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे कारण त्यांनी आपल्या कार्यामध्ये टीमवर्क काय असते ते दाखवून दिले. टीमवर्कमध्ये एकमेकांस समजून, चर्चेद्वारे कार्य केल्यास सकारात्मक यश मिळते. त्यामुळे आपल्याबरोबरच देशाची देखील प्रगती होते. म्हणून स्वप्न सत्यात उतरण्यासाठी कार्यात सातत्य ठेवा.' असेही त्यांनी सांगितले. यावेळी गौरी महाजन, मंजुश्री नायकुडे व आशिष शिंदे या विद्यार्थ्यांनी आज आयोजित केलेल्या मार्गदर्शनपर सत्रात सर्वोत्तम प्रतिक्रिया दिल्यामुळे त्यांना ड्रीम फौंडेशन तर्फे पुस्तके खरेदी करण्यासाठी रोख रक्कम बक्षीस स्वरुपात देण्यात आली. यावेळी बी.ए.आर.सी.चे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. व्ही. के. सुरी, डॉ.विजय कुलकर्णी, विवेक वर्धिनी प्रशालेचे सेवानिवृत्त प्राचार्य राजेंद्र पाराध्ये, बिटरगावचे सरपंच बाबासाहेब धुमाळ, सामाजिक कार्यकर्ते देविदास कसबे, गणेश यादव, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त बी. डी.रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही. मांडवे, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.